MHBI120013462022

**<u>किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३३५/२०२२</u>**
**<u>सुरज वि. निरंक</u>**
**<u>मधील नि.क्र. १ खालील आदेश</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट १८२७ मधील कलम २ च्या तरतुदीनुसार वारस दाखला प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी थोडक्यात कथन केले आहे की , मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** हे दिनांक **२०.०१.१९९७** रोजी किल्लेधारुर ता. धारुर जि.बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार मयताचा मुलगा आहे. मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शासकिय व निमशासकिय कामाकरीता वारस दाखला अर्जदार यांनी त्यांचे नावे मिळण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयार्थ दिनांक ०३.११.२०२२ रोजी ''दैनिक लोकनायक '' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली हरकत नोटीस (निशाणी क्र.०९) दाखल केली. सदर हरकत नोटीस (निशाणी क्र. ०९) यास कोणाचीही हरकत आलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहीला आहे.

४. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठयार्थ स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र. १०) पुराव्याकामी दाखल केले. कागदोपत्री पुरावा म्हणून मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी क्र.०६ )वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी अधिकचा तोंडी व लेखी पुरावा देणे नसलेबाबतची पुरसिस (निशाणी क्र. ११) वर दाखल केले आहे.

५. मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** हे दिनांक २०.०१.१९९७

रोजी मयत झाल्याचे व त्यांचे पश्चात अर्जदारांशिवाय कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. तसेच जाहीर प्रगटनास कोणीही आक्षेप वा हरकत घेतली नसल्याचे कथन केले आहे.

६. प्रस्तुत प्रकरणातील पुराव्याचे अवलोकन केले आहे. अर्जदार यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांचे वडील दिनांक २०.०१.१९९७ रोजी किल्लेधारुर , ता. धारुर जि.बीड येथे मरण पावले आहेत. मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांचे पश्चात केवळ अर्जदार हेच मयताचे वारस आहेत. अर्जदार यांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक ०३.११.२२ रोजीच्या दैनिक लोकनायक या वर्तमानपत्रात जाहीरसूचनापत्र (निशाणी क्र.०९) प्रकाशित करुन आक्षेप मागविण्यात आला. आजपर्यंत कोणीही हजर झाला नाही अथवा आक्षेप व हरकत घेतली नाही.

७. अर्जदार यांनी सदरचा अर्ज **मयत व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांच्या मृत्यू नंतर अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांच्या नावाने वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे. तथापि मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही.

८. सदरचा अर्ज निकाली काढताना मयताचे कायदेशीर वारस कोण आहेत हे तपासणे आवश्यक आहे. अभिलेखाचे परिक्षण केले असता असे दिसून येते की, मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांना अर्जदार हा मयताचा मुलगा या नात्याने मयताचे वारस असल्याचे प्राथमिकदृष्टया दिसून येते. अर्जदार हे मयताचे वारस असल्याने त्यांच्या नावाने वारसदाखला देण्यास कोणतीही कायदेशीर बाधा दिसून येत नाही. वरील विवेचनावरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे **अर्जदार सुरज पिता व्दारकाप्रसाद दुबे** हे मयत **व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते .

२) अर्जदार हे **मयत व्दारकाप्रसाद किसनप्रसाद दुबे** , मौजे किल्लेधारुर ता.किल्लेधारुर, जि. बीड यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियमच्या परिशिष्ट १ कलम १२ सह कलम १० अन्वये लागणारे विहित न्यायालयीन शुक्ल अर्जदारांनी भरल्यास देण्यात यावे.

३) येणे प्रमाणे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) देण्यात यावे.

स्वाक्षरीत /-
(श्रीमती ए.बी.जोंधळे )
२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),धारुर

स्थळ–धारुर
दिनांक – २३.१२.२०२२